सरस प्रदर्शनात सहभागी होण्याकरिता स्वयं सहाय्यता समूहासाठी नियम व अटी

१. समुह NRLM पोर्टल वर/ राष्ट्रीय ग्रामीण जीवनन्नोती अभियाना अंतर्गत नोदणीकृत असला पाहिजे. नोंदणी क्रमांक online Registerकरण्यासाठी आवश्यक आहे.
२. समुह या आधी ०२ पेक्षा जास्त वेळा राज्य व अंतराज्या सरस प्रदर्शनात सहभागी झालेला नसावा. तसे असल्यास समुह reject करण्यात येईल.
३. समूहाने प्रदर्शनात सोबत येताना सहभागीदरांचे २ फोटो, उत्पादांची यादी व त्याची किंमत, पावती पुस्तक सोबत आणणे अनिवार्य आहे.
४. समूहाने उत्पादन स्वतः उत्पादित केले असले पाहिजे. Trading उद्योग प्रदर्शनात सहभागी होऊ शकत नाही.
५. प्रदर्शात सहभागी होणाऱ्या समूहाचे प्रतिनिधीत्व केवळ समूहातील सदस्य व्यक्ती करेल. समूहातील सदस्या व्यतिरिक्त स्तर कोणतीही व्यक्ती प्रदर्शनामध्ये उपस्थित राहणार नाही. Food Court (नाश्ता व जेवण) stall करिता तिसरी व्यक्ती उपस्थित राहू शकते.
६. एका समूहाचे एकवेळेस जास्तीतजास्त ०२ व्यक्ती/सदस्य प्रदर्शनामध्ये सहभागी होऊ शकतात.
७. समूहांनी किमान रु १.०० लाख इतक्या किमतीचा माल विक्री करिता उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मालाच्या वाहतुकीवरील येणारा खर्च देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
८. सहभागी समूहातील जास्तीतजास्त ०२ सहभागीदारांना रु २५०/- प्रत्येकी प्रमाणे दैनंदिन भत्ता दिला जाईल. सदर भत्ता प्रदर्शनाच्या कालावधी पूर्ण करणाऱ्या सहभागीदारांना दिला जाईल.
९. समूहाचा कुठलाही उद्योग/व्यवसायाला DIC- 'उद्योग आधार' नोंदणी आवश्यक आहे व सदर नोंदणी क्रमांक onlineregistration फोर्म मध्ये भरणे अनिवार्य आहे. समूहाचा उद्योग/व्यवसाय खाद्य पदार्था विषयी असेल तर FSSAI नोंदणी क्रमांक सुद्धा अनिवार्य आहे. नोंदणी क्रमांक खाद्य पदार्था च्या पाकिटावर असणे आवश्यक आहे.
१०. प्रदर्शन काळात समूहाने त्यांच्या नावाचा स्टॉल दुसऱ्याला देता/विकता येणार नाही. तसे झाल्यास समूहावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल .